महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

प्रकटन

क्रमांक पुविमं/माध्यमिक–क, उच्च माध्य–अ/1118
पुणे–411005.
दिनांकः–22/02/2023.

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व माध्यमिक शाळा/विद्यालय
पुणे,अहमदनगर,सोलापूर .

विषय– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) आणि उच्च माध्यमिक इ.(इ.12वी) फेब्रुवारी–मार्च 2023 परीक्षेकरिता प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांक विद्यार्थ्यास सवलती देणेबाबत...

संदर्भ–1.क्रमांक रा.मं./परीक्षा–5/835/दिनांकः–17/02/2023.

संदर्भ–2 शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2017/117/17 एस.डी.–6 दि.16 ऑक्टोबर 2018.

उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरून सर्व माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक प्राचार्य यांना कळवियात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी)व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रुवारी–मार्च 2023 च्या परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना ज्यादा वेळ व लेखनिक मिळणेबाबत शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विभागीय मंडळास प्रस्ताव प्राप्त होत असतात त्यानुसार विद्यार्थ्यांना जादा वेळ सवलत /लेखनिक देणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

तसेच शासन निर्णयानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना सवलती देणेबाबत निकष ठरवून देण्यात आलेले आहेत तथापि काही शाळा/कनिष्ठ महाविद्यालये शासन निर्णय व राज्य मंडळाने ठरवून दिलेल्या निकषाव्यतिरिक्त कागदपत्राची मागणी करतात त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो तसेच काही विद्यार्थी सवलतीपासुन वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही

त्यामुळे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी)व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रुवारी–मार्च 2023 च्या परीक्षेकरिता प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ होताना कुठल्याही प्रकारचे अडथळे येणार नाहीत तसेच कोणताही दिव्यांग विद्यार्थी त्यांना मिळणाऱ्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रतः– माहितीसाठी तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव
1) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे–411001.
2) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हापरिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर